**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi,

**(Maharashtra)**

**Academic Year 2024-2025**

# Publicity

Submitted by

**Prof. Dr. V. P. Shikhare**

**I/C Principal**

**Prof. Dr. M. S. Disale**

**IQAC Coordinator**

**Dr.M.V.Mate**

**Publicity Coordinator**

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

# पुढारी

www.pudhari.com

**संक्षिप्त**

News by
गणेश गोडसे, बार्शी



बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये वृक्षारोपण करताना मान्यवर.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये वृक्षोत्सव पंधरवडा

**बार्शी :** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये भारतीय वृक्षांची लागवड करून वृक्षोत्सव पंधरवडा साजरा करण्यात आला. पंधरवड्याचा समारोप महाविद्यालयाच्या कर्मवीर क्रीडा संकुलामध्ये करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुग्रिव गोरे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे, तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले उपस्थित होते. व्यासपीठावर डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ एस. एम. लांडगे, डॉ. ए. जी. कांबळे, प्राचार्य डॉ.शेख आदी उपस्थित होते.प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून ५० वृक्ष लागवड करण्याची संकल्पपुर्ती करण्यात आली. वृक्षोत्सव पंधरवडा उपक्रमाचे समन्वयक सहा. प्रा. पी.पी. नरळे यांनी प्रास्ताविक केले. त्यामध्ये या पंधरवड्यामध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पी. ए. पाटील यांनी केले. डॉ. एम. व्ही. मते यांनी आभार मानले.

Solapur Edition
Jun 28, 2024 Page No. 09
Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**



बार्शी : विद्यार्थ्यांना सायकली वाटप करताना मान्यवर.

## गरजू विद्यार्थ्यांसाठी सायकल बँक उपक्रम

**बार्शी :** श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जिजाऊ सावित्री रमाई महिला बळ विकास समिती यांच्यातर्फे महाराष्ट्र विद्यालय बार्शी येथील गरजू विद्यार्थी आयान पठाण याला सायकलचे वाटप करण्यात आले. कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, जिजाऊ सावित्रीबाई महिला बळ विकास समितीच्या सर्व पदाधिकारी, तसेच. एम. पी. एड. विभाग प्रमुख डॉ. एस. एम. लांडगे, बी पी एड विभाग प्रमुख डॉ. ए. जी. कांबळे व इतर शिक्षक यांच्या हस्ते करण्यात आले. यावर्षीपासून महिला समितीने सायकल बँक हा उपक्रम हाती घेतलेला आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी गरजूंसाठी १ सायकल व डॉ ए. जी. कांबळे यांनी गरजूंसाठी २ सायकल देण्याचे जाहीर केले. समितीच्या कार्याध्यक्ष डॉ. एल. आय. राठोड यांनी आभार मानले.

Solapur Edition
Aug 4, 2024 Page No. 07
Powered by: erelego.com

सोलापूर

प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

**तरुण भारत**

epaper.dainiktarunbharat.com

02 Aug 2024 - Page 2



## बार्शी येथील शाह कन्या प्रशालेत बी.एड. प्रशिक्षणार्थींना निरोप

**बार्शी, दि. १ ऑगस्ट-**

प्रशालेतील आंतरवासीता उपक्रमाचा अनुभव भविष्यात उत्तम शिक्षक बनण्यासाठी उपयुक्त ठरेल. त्या दृष्टीने विद्यार्थिनींनी तयारी करावी, असे मार्गदर्शन मुख्याध्यापिका शुभदा जोशी यांनी केले. ८ ते ३१ जुलै या कालावधीत शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथील बी. एड. प्रशिक्षणार्थींचे सराव पाठ सत्र शाह कन्या प्रशालेत पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्रास्ताविक ज्योत्स्ना म्हेत्रे यांनी केले. श्रद्धा पवार व चव्हाण या विद्यार्थिनींनी मनोगतामधून प्रशिक्षणार्थ्यांनी राबवलेल्या विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. प्रशिक्षणार्थी दीक्षा कांबळे व वैशाली कांबळे यांनी प्रशालेत मिळालेल्या अध्यापन अनुभवाचे वर्णन केले. शालेय संपर्क शिक्षक संदेश घाडगे यांनी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या. प्रा. डॉ. पी. ए. पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्रशिक्षणार्थिनी प्रशालेस इलेक्ट्रॉनिक वजनकाटा भेट दिला. सूत्रसंचालन फातिमा महेदवी यांनी केले तर आभार गौरी निकम यांनी मानले.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com



बार्शी : संशोधन अहवाल सादर केलेल्या विद्यार्थ्यांसह प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे व इतर मान्यवर.

# कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये संशोधन अहवाल सादर

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे मान्यताप्राप्त पीएच.डी. संशोधन केंद्र आहे. हे संशोधन केंद्र शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण या विषयाचे आहे. पेट सात व आठ प्रवेशित पीएच.डी. संशोधन विद्यार्थ्यांचे सहामाही प्रगती अहवाल सादरीकरण संशोधन सल्लागार समितीसमोर करण्यात आले.

समितीचे अध्यक्ष म्हणून कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे होते. यावेळी विद्यापीठ नामनिर्देशित विषयतज्ज्ञ म्हणून डॉ. ए. एम. रंगरेज व डॉ. के. जे. शिंदे ( शिक्षणशास्त्र) तसेच प्रा. सिंकू कुमार सिंग व डॉ. विक्रम कुंतलवार (शारीरिक शिक्षणशास्त्र) उपस्थित होते. यावेळी संशोधन मार्गदर्शक म्हणून डॉ. व्ही.पी. शिखरे, डॉ. ए. जी. कांबळे, डॉ. एम.एस. डिसले, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. एम. व्ही. मते उपस्थित होते.

सादरीकरण झाल्यानंतर समितीने संशोधन विद्यार्थ्यांना आवश्यक सूचना दिल्या. समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी संशोधन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वेळेत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी संशोधन विद्यार्थ्यांनी क्षेत्र अभ्यास, भेटी, ग्रंथालय अभ्यास, संशोधन प्रकाशने, परिषद सहभाग आदी उपक्रमांत सहभागी व्हावे, असे आवाहन केले. यावेळी डॉ. ए. जी. कांबळे यांनी शारीरिक शिक्षणचे समन्वयक, तर डॉ. एम. व्ही. मते यांनी शिक्षणशास्त्राचे समन्वयक म्हणून काम पाहिले.

My Solapur Edition Edition
Aug 10, 2024 Page No. 03
Powered by:

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

पुढारी

www.pudhari.com



बार्शी : रंगनाथन यांना अभिवादनप्रसंगी उपस्थित मान्यवर.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये ग्रंथपाल दिन साजरा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त बार्शीतील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात झाला.

याप्रसंगी मार्गदर्शक म्हणून शिंदे महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. राहुल देशमुख, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते. डॉ. देशमुख यांनी 'शिक्षणात ऑनलाईन प्लॅटफॉर्मचा वापर' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी विविध ऑनलाईन साधने आणि त्यांचा उपयोग शिक्षण क्षेत्रात कसा करावा, याची माहिती दिली.

प्राचार्य डॉ. गोरे यांनी ग्रंथालयाचा वापर अधिक प्रभावीपणे कसा करावा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात ग्रंथालयाची भूमिका कशी महत्त्वाची आहे, यावर भर दिला. प्रास्ताविक डॉ. सुनील जाधव यांनी केले. पंकज नरळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. रविराज फुरडे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. शरद सावळे यांनी आभार मानले.

### रंगनाथन यांच्या कार्याला उजाळा

कार्यक्रमात डॉ. राहुल देशमुख व प्राचार्य डॉ. गोरे यांनी भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या कार्याला उजाळा दिला. त्यांच्या कार्याचा आदर्श सर्वांनी घ्यावा, असे आवाहन केले.

My Solapur Edition Edition
Aug 17, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी



बार्शी : 'अँटी रॅगिंग' कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये 'अँटी रॅगिंग' सप्ताह

**बार्शी :** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये 'अँटी रॅगिंग' सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. समारोपाला कार्यशाळेत तज्ज्ञांचे मार्गदर्शन झाले. या सप्ताहाचा समारोप विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना वेबसाईटवरील माहितीपट व लघुपट ऑनलाईन पद्धतीने दाखविण्यात आला. याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंगबाबत जागृती तसेच माहिती व दाद मागण्याची प्रक्रिया तसेच रॅगिंगचे प्रकार, रॅगिंग नेमके कशाला म्हणायचे याबाबतही व्हिडिओद्वारे उद्बोधन करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी महाविद्यालयाच्या सर्व प्रशिक्षणार्थींना महाविद्यालयातील वातावरण खेळीमेळीचे व सहकार्यमय ठेवण्याबाबत आवाहन केले. या सप्ताहाच्या नियोजनाची जबाबदारी समन्वयक सहा. प्रा. पी. पी. नरळे यांनी पार पाडली.

My Solapur Edition Edition
Aug 24, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

News by
गणेश गोडसे,बार्शी

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये क्रीडा दिन



बार्शी : राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना प्रा. डॉ. सुग्रीव गोरे व इतर.

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ सुग्रीव गोरे होते. व्यासपीठावर डॉ एस एम लांडगे, डॉ ए जी कांबळे आदी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे व मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमपूजनाने सुरुवात झाली. प्रास्ताविक अझरुद्दीन मुलाणी यांनी केले. नीरज कुमठके, नवनाथ गडदे, कोमल जंत्रे आणि संदेश भोजकर यांनी क्रीडा व खेळ याविषयी मनोगत व्यक्त केले. प्रा. के बी चव्हाण यांनी मेजर ध्यानचंद यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य गोरे यांनी भारताची क्रीडा परंपरा जोपासण्यासाठी तसेच मेजर ध्यानचंद यांच्या समर्पणाचा सन्मान करण्यासाठी क्रीडा दिन साजरा केला जातो असे सांगितले. कॉलेजमध्ये क्रीडा व खेळ याविषयी पोस्टर प्रदर्शन व क्रीडा साहित्य प्रदर्शन करण्यात आले. आभार मधुरा देशमुखे तर श्वेता मोरे व तेजस्वी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

Solapur Edition Edition
Sep 01, 2024 Page No. 07
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

**पुढारी**

स्थापना १९३९

www.pudhari.com

News by
गणेश गोडसे,बार्शी

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा झाला.

अध्यक्षस्थानी कॉलेजचे प्राचार्य सुग्रीव गोरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार गुळमिरे, डॉ. व्ही.पी. शिखरे, डॉ. ए. जी. कांबळे, डॉ. एस. एम. लांडगे, डॉ. एल. आय. राठोड, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. एम. एस. डिसले, कार्यक्रम समन्वयक डॉ. एम. व्ही. मते आदी उपस्थित होते.

ज्योत्स्ना म्हेत्रे यांनी प्रास्ताविक केले. कोमल नहार यांनी शिक्षक गीत सादर केले. स्वप्नाली काळे यांनी



**बार्शी : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनप्रसंगी प्राचार्य गोरे यांच्यासह इतर मान्यवर.**

प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. निबंध लेखन व वकृत्व स्पर्धेतील गुणवंतांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. निबंध लेखन स्पर्धेत संदीप शिंदे, रोहित जगताप, ऋषीकेश गायकवाड, प्रियंका खबाले, हर्षवर्धन क्षीरसागर व विद्या अर्जुने यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ, असे यश प्राप्त केले. वक्तृत्व स्पर्धेत कल्पना बारबोले, विद्या अर्जुने, वैशाली कांबळे व शुभम मारकड यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ असे क्रमांक संपादन केले. झिपा मुल्ला यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्यावर मनोगत व्यक्त केले. आशुतोष कानडे यांनी 'सेल्फी विथ माय टीचर' यावर आधारित चित्रफित सादर केली.

गुळमिरे यांनी 'आजच्या शिक्षकांची कर्तव्ये व जबाबदारी' याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य गोरे म्हणाले की, शिक्षक हे समाजातील अत्यंत जबाबदार घटक आहेत. शिक्षकांनी उत्साही व आशावादी असले पाहिजे. सूत्रसंचालन अनुजा शेळके यांनी केले. रेणुका रानमाळ यांनी आभार मानले.

My Solapur Edition Edition
Sep 10, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com
संक्षिप्त

News by
गणेश गोडसे,बार्शी

## पीएच.डी.ने समिता पाटील सन्मानित

**बार्शी :** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र विषयाचे संशोधन केंद्र आहे. या संशोधन केंद्रातील पेट सातच्या विद्यार्थिनी समिता गौतम पाटील यांनी विद्यापीठास अंतिम पीएच.डी. संशोधन प्रबंध सादर केला. पीएच.डी. मौखिक परीक्षेनंतर पाटील यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांच्या संशोधनाचा विषय 'डेव्हलपमेंट ऑफ डिजिटल लिटरसी प्रोग्राम फॉर द सेकंडरी स्कूल स्टुडंटस् इन सांगली डिस्ट्रिक्ट' असा होता. त्यांनी डॉ. व्ही. पी. शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. संशोधन कार्य पूर्ण केले. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे, डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एम.व्ही. मते, सर्व संशोधक मार्गदर्शक आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



समिता पाटील

My Solapur Edition
Oct 03, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

पुढारी

www.pudhari.com

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये 'स्वच्छता सप्ताह'

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी येथे २७ सप्टेंबर ते दोन ऑक्टोबरदरम्यान राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'स्वच्छता सप्ताह' आयोजित करण्यात आला. या 'स्वच्छता सप्ताहा'चे आयोजन संस्थेच्या वतीने करण्यात आले होते.

संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कॉलेज परिसरात स्वच्छता मोहीम उत्साहात राबविण्यात आली. २७ सप्टेंबर २०२४ रोजी 'स्वच्छता सप्ताहा'चे उद्घाटन कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांच्या उपस्थितीत झाले. दोन ऑक्टोबर २०२४ रोजी महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून 'स्वच्छता सप्ताहा'चा समारोप करण्यात आला. या उपक्रमांतर्गत कॉलेज परिसरातील क्रीडांगणे, मैदान, वर्गखोल्या, कार्यालय, कॉलेज परिसर, टेरेस, मुलींचे वसतिगृह येथे स्वच्छतेचे नियोजन व कार्यवाही करण्यात आली. कॉलेज परिसरातील बाग, वृक्ष संवर्धन, वृक्षांची निगा व काळजी इत्यादींबाबतचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांनी स्वच्छतेचे महत्त्व विशद केले. स्वच्छता राखणे ही प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे. सर्वांनी स्वच्छतेचे मूल्य अंगीकारून रुजविले पाहिजे. स्वच्छ परिसर निरोगी आरोग्य राखतो. स्वच्छतेमुळे आत्मविश्वास वाढतो. स्वच्छता ही उत्साहाने नावीन्यपूर्ण कार्य करण्यास प्रेरणा देते. स्वच्छतेमुळेच मानवी मन समृद्ध होते. स्वच्छता हा परिसराचा आत्मा आहे. त्यामुळे प्रत्येकाने स्वच्छता राखणे गरजेचे असल्याचे त्यांनी विशद केले. 'स्वच्छता सप्ताह' उपक्रमामध्ये कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी सहभागी झाले होते.

Solapur Edition
Oct 04, 2024 Page No. 10
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

पुढारी

www.pudhari.com

News by
गणेश गोडसे,बार्शी

संक्षिप्त

## पीएच.डी.ने शिवकन्या कदेरकर सन्मानीत

**बार्शी :** येथील शिक्षण शास्त्रच्या शिवकन्या निवृत्तीराव कदेरकर यांनी विद्यापीठास अंतिम पीएच डी संशोधन प्रबंध सादर केला. मौखिक परीक्षेनंतर कदेरकर यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी शिक्षणशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांच्या संशोधनाचा विषय 'सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक शालेय स्तरावर पर्यावरण जाणीव जागृतीसाठी कार्यक्रमाचे विकसन' असा होता. त्यांनी डॉ. एम. व्ही. मते यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच डी संशोधन कार्य पूर्ण केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. ए. जी. कांबळे, पीएच. डी. संशोधन केंद्राचे समन्वयक तथा संशोधक मार्गदर्शक डॉ. एम. व्ही. मते आदींनी अभिनंदन केले आहे.



शिवकन्या कदेरकर

Solapur Edition
Oct 07, 2024 Page No. 07
Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2024 to 2025

पुढारी

संक्षिप्त

News by
गणेश गोडसे, बार्शी



बार्शी : चेंडू टोलवून टेबल टेनिस स्पर्धेचा प्रारंभ करताना मान्यवर.

### बार्शीतील टेबल टेनिसमध्ये डब्ल्यूआयटी प्रथम

बार्शी : येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या वतीने आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेत सोलापूरच्या डब्ल्यूआयटी कॉलेजच्या मुले व मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. प्रशांत पैकेकर व संस्थेचे सहसचिव अरुण देबडवार यांच्या उपस्थितीत स्पर्धेला प्रारंभ झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे होते. यावेळी एन. एन. पुदे, बाळासाहेब वाघचौरे, दत्ता बिराजदार, डॉ. एस.एम. लांडगे उपस्थित होते. मुलांच्या गटात डब्ल्यूआयटी कॉलेज, सोलापूर (प्रथम), डीएसटीएस फार्मसी कॉलेज, सोलापूर (द्वितीय), एनबीएन कॉलेज सोलापूर (तृतीय). मुलींच्या गटात डब्ल्यूआयटी कॉलेज, सोलापूर (प्रथम), डीएसटीएस फार्मसी कॉलेज, सोलापूर (द्वितीय), सांगोला महाविद्यालय, सांगोला (तृतीय).

Solapur Edition
Oct 16, 2024 Page No. 10
Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

# कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये वाचन प्रेरणा दिन

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते. यावेळी डॉ. एम. एस. डिसले, डॉ. आर. ए. फुरडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एम. व्ही. मते, डॉ. एस. एल. जाधव, प्रा. एस. एस. सुरवसे, डॉ. एल. आय. राठोड, अमोल पालके आदी उपस्थित होते.



**बार्शी : वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात प्रतिमापूजन करताना उपस्थित मान्यवर.**

याप्रसंगी प्राचार्य डॉ. गोरे विचार व्यक्त करताना म्हणाले की, सर्वांनी वाचन संस्कृती जोपासावी. वाचन केल्याने आपली विचारशक्ती वाढते, ज्ञानात भर घालता येते, भाषा कौशल्ये सुधारतात, कल्पनाशक्तीला वाव मिळतो आणि संवाद कौशल्ये विकसित करता येतात. प्रास्ताविक डॉ. जाधव यांनी केले.

सूत्रसंचालन डॉ. एम. व्ही. मते यांनी केले. डॉ. आर. ए. फुरडे यांनी आभार मानले.

My Solapur Edition

Oct 17, 2024 Page No. 03

Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

## ‘कर्मवीर गुणवंत शिक्षक’ पुरस्काराने डॉ. शिखरे सन्मानित

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथील बी.एड्. विभागप्रमुख व आयक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे यांना महाविद्यालय गटातील ‘कर्मवीर गुणवंत शिक्षक’ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

लातूर विभागीय मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग, उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, ए. पी. देबडवार, खजिनदार जे. सी. शितोळे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.



बार्शी : डॉ. व्ही. पी. शिखरे यांना पुरस्काराने सन्मानित करताना उपस्थित मान्यवर.

डॉ. शिखरे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथे आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता, मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य, सिनेट सदस्य, ॲकॅडमिक कौन्सिल सदस्य तसेच विविध समित्यांवर अध्यक्ष व सदस्य म्हणून कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आठ विद्यार्थ्यांनी शिक्षणशास्त्रातील सर्वोच्च पीएच.डी. पदवी प्राप्त केली, तर तीन संशोधक विद्यार्थ्यांनी एम.फिल. पदवी प्राप्त केली आहे. आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय जर्नल्समध्ये एकूण ७६ संशोधन पेपर प्रकाशित केले असून दोन मायनर रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण केले आहेत. पुरस्काराबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्य, विश्वस्त, कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

My Solapur Edition
Oct 24, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये प्रशिक्षणार्थींचे सराव अध्यापन

### सलग सराव पाठ, आशययुक्त अध्यापन व आयसीटीद्वारे घेतले पाठ

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे बी.एड्. द्वितीय वर्ष सत्र तिसरे प्रशिक्षणार्थींचे सराव अध्यापन व शालेय आंतरवासिता प्रात्यक्षिकांचा अहवाल प्रकाशन व प्रत्याभरण तथा बोल अनुभवाचे कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते. बी.एड्. विभागप्रमुख डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. आर. ए. फुरडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एम. व्ही. मते, डॉ. पी. ए. पाटील, प्रा. एस. ए. सावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बी.एड्. द्वितीय वर्षाचे शालेय आंतरवासिता प्रात्यक्षिक साधना कन्या प्रशाला, मॉडेल हायस्कूल, जिजामाता विद्यामंदिर, शेठ अगरचंद कुंकूलोळ हायस्कूल आणि सौ. हि. ने. न. शाह कन्या प्रशालेत गटनिहाय पद्धतीने घेण्यात आले. यात बी.एड्. प्रशिक्षणार्थींनी सलग सराव पाठ, आशययुक्त अध्यापन व आयसीटी अध्यापनद्वारे पाठ घेतले. भाषिक कौशल्ये विकसन, प्रकल्प, व्यक्ती अभ्यास, विशेष दिन, समाजसेवा, सर्वंकष मूल्यमापन, अवांतर माहिती, पाठ निरीक्षण, शिक्षण सप्ताह आदी उपक्रम राबविले. या उपक्रमाचे अहवाल प्रकाशन व सादरीकरण करण्यात आले. विद्या अर्जुने, संदीप शिंदे, दिव्या आवारे, दीपा गुरव आणि वैशाली कांबळे यांनी पीपीटीद्वारे सादरीकरण केले व अनुभव व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एम. व्ही. मते यांनी, तर आभार डॉ. पी. ए. पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुजा शेळके व निलोफर शेख यांनी केले.




बार्शी : शालेय आंतरवासिता प्रात्यक्षिकांचा अहवाल प्रकाशन करताना प्राचार्य डॉ. गोरे यांच्यासह इतर मान्यवर.

> "या अभ्यासक्रमातून भावी शिक्षकांना शालेय नियोजन, व्यवस्थापन, शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील भूमिका कशी असावी याचे प्रशिक्षण दिले जाते. समुपदेशन, वैयक्तिक समस्यांचे निराकरण आणि विद्यार्थ्यांशी घनिष्ठ संबंध कसे प्रस्थापित करावेत हे शिकतात. शैक्षणिक साहित्यनिर्मिती व वापर याची माहिती मिळते. एक सक्षम शिक्षक होण्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती दिली जाते.
>
> **- डॉ. एस. एस. गोरे**, प्राचार्य

Solapur Edition
Oct 27, 2024 Page No. 11
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com



बार्शी : कर्मवीर टॅलेंट सर्च परीक्षा देत असल्याचे विद्यार्थी.

# कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये केटीएस परीक्षा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीच्या श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त सामान्य ज्ञानावर आधारित कर्मवीर टॅलेंट सर्च परीक्षेचे कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी येथे आयोजन करण्यात आले. या परीक्षेत एकूण ५८ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला.

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व सकारात्मक दृष्टिकोन विकसित व्हावा, या उद्देशाने संस्थेच्या वतीने प्रतिवर्षी कर्मवीर जयंतीनिमित्त केटीएस परीक्षेचे मोठ्या स्वरूपात आयोजन केले जाते. महाविद्यालयीन स्तरावर एकूण १०० प्रश्न असलेली १०० गुणांची परीक्षा घेतली जाते. यात विविध घटकांवर आधारित बहुपर्यायी प्रश्न विचारले जातात. यावर्षीही या स्पर्धेत बी एड, बी पी एड, एम एड,एम पी एड विभागाच्या प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला. महाविद्यालयात शुभम मारकड, ज्योत्सना म्हेत्रे व सुजाता माळी यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धा यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, स्पर्धा समन्वयक डॉ. एम. व्ही. मते, डॉ. आर. ए. फुरडे, प्रा. पी. पी. नरळे, प्रा. के. बी. चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.

Solapur Edition
Dec 28, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

## Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s

# College of Education, Barshi

## Publicity 2024 to 2025

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये वाचन संकल्प उपक्रम

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये आयक्यूएसी, ग्रंथालय विभाग, सांस्कृतिक विभाग व रासेयो विभाग यांच्यावतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाला डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एस. एम. लांडगे, डॉ. एस. एल. जाधव, डॉ. एम. एस. डिसले आदी उपस्थित होते. तरुणांमध्ये वाचन संस्कृती विकसित व्हावी. वाचनामुळे तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाचे भरणपोषण होते. वाचनामुळे सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते. तरुणवर्गाला ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याच्या हेतूने दि. १ ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम सुरू करण्यात आल्याचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी सांगितले.



**बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये पुस्तकांची पाहणी करताना विद्यार्थी.**

या उपक्रमात ग्रंथ प्रदर्शन, सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा, लेखक आपल्या भेटीला आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यावेळी कॉलेजमध्ये ग्रंथ प्रदर्शन उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांवर आधारित ग्रंथ व पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. डॉ. शिखरे यांनी वाचन संस्कृती संकल्पना स्पष्ट केली. वाचनाचे महत्त्व विशद केले. प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. जाधव यांनी केले. सूत्रसंचालन व आभार डॉ. डिसले यांनी केले.

Solapur Edition
Jan 04, 2025 Page No. 10
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

संक्षिप्त




बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनचे श्रम संस्कार शिबिरात मार्गदर्शन करताना जयकुमार शितोळे.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनचे श्रम संस्कार शिबिर

**बार्शी :** तालुक्यातील उपळाई ठोंगे येथील किसान कामगार विद्यालयात बार्शीच्या कॉलेज ऑफ एज्युकेशनचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिराचा प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. एस. एस.गोरे हे होते. उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर किसान कामगार विद्यालयाचे मुख्याध्यापक चौधरी, जिल्हा परिषद शाळा क्रमांक १ चे सहसिक्षक घाडगे उपस्थित होते. जयकुमार शितोळे यांनी उद्घानप्रसंगी संदेशातून युवकांची मने प्रज्वलित केली. प्रास्ताविक विभागीय समन्वयक प्रा.डॉ.एम.एस. डिसले यांनी केले. हर्षदा पाडुळे व शुभम मारकड यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यानी आपल्या मार्गदर्शनपर भाषनातून शिबिरातील सहभागी स्वयंसेवकांना व उपस्थितांना बोधकथेच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. गोरे यांनी समाजप्रबोधन व समाजपरिवर्तनाची चावी युवकांच्या हाती असून त्यांनी समाजसुधारक म्हणून भूमिका बजावणे ही काळाची गरज आहे, असे सांगितले. स्वयंसेवक मनोगत हर्षदा पाडुळे व तसेच इंग्रजी संवाद कौशल्य प्रशिक्षण याबाबत रूपरेषा शुभम मारकड यांनी मांडली. सूत्रसंचालन दिव्या अवारे व अशितोष कानडे यांनी केले. प्रा.शरद सावळे यांनी आभार मानले.

Solapur Edition

Jan 18, 2025 Page No. 05

Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com



बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये व्याख्यान देताना डॉ. केशव देशमुख.

## नकारात्मक विचार टाळावेत : डॉ. देशमुख

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांनी स्वतःबद्दलचा न्यूनगंड कमी करावा. नकारात्मक विचार टाळावेत, स्वतःचा आवाज ओळखावा, असे प्रतिपादन भाषा सल्लागार समिती सदस्य डॉ. केशव देशमुख यांनी केले.

कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी आणि मराठी भाषा विभाग यांच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने डॉ. देशमुख यांचे व्याख्यान झाले. व्याख्यानाचा विषय ‘मराठी भाषा - रोजगाराच्या संधी’ असा होता. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते. व्यासपीठावर डॉ. व्ही. पी. शिखरे, प्रा. एस. एस. सुरवसे, डॉ. पी. ए. पाटील, प्रा. पी. पी. नरळे, प्रा. एस. ए. सावळे आदी उपस्थित होते.

डॉ. देशमुख पुढे म्हणाले की, मराठीसोबत बहुभाषिक व्हा. मराठी भाषेतून करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. व्यवसायाच्या बाबतीत संयम ठेवा, गरजेनुसार संधी मिळते. मराठी भाषेला समृद्ध परंपरा आहे. मराठी ही शिष्टाचाराची व संस्काराची भाषा आहे. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. गोरे यांनी मराठी भाषेची समृद्ध परंपरा विशद केली. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवून व्यावसायिक विकास साधावा असे त्यांनी आवाहन केले. प्रास्ताविक डॉ. एम. व्ही. मते यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. एम. एस. डिसले यांनी करून दिला.सूत्रसंचालन डॉ. एल. आय. राठोड यांनी केले. प्रा. एस. ए. सावळे यांनी आभार मानले.

Solapur Edition

Jan 30, 2025 Page No. 09

Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये राष्ट्रीय मतदार दिन

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये आयक्यूएसी, राष्ट्रीय सेवा योजना आणि निवडणूक साक्षरता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे होते.

यावेळी बीपीएड विभाग प्रमुख डॉ. ए. जी. कांबळे, नोडल अधिकारी तथा समन्वयक डॉ. एम. व्ही. मते, डॉ. पी. ए. पाटील तसेच बी एड विभागाचे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

Solapur Edition
Feb 01, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2024 to 2025

पुढारी
www.pudhari.com

# कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये रक्तदान शिबिर

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले.

बार्शी येथील इंडियन रेड क्रॉस सोसायटी संचलित श्रीमान रामभाई शाह रक्त केंद्र यांच्यावतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन कॉलेजचे प्राचार्य डॉ एस एस गोरे यांनी केले. या रक्तदान शिबिरात ३९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी प्राचार्य डॉ एस एस गोरे यांनी प्रशिक्षणार्थींना रक्तदानचे महत्व विशद केले. मानवी रक्ताला पर्याय नाही असे त्यांनी सांगितले. रक्तदान हेच श्रेष्ठदान आहे. नेहमी आपण मानवतेची जाण ठेवून रक्तदानात सहभागी व्हावे असे आवाहन केले. यावेळी प्राचार्य डॉ एस एस गोरे, डॉ ए जी कांबळे, डॉ एम व्ही मते, प्रा. पी पी नरळे, डॉ एस एल जाधव, प्रा. के बी चव्हाण यांच्यासह बी एड व बी पी एड प्रशिक्षणार्थींनी रक्तदान केले.

Solapur Edition
eb 03, 2025 Page No. (
'owered by: erelego.cor

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

## कॉलेज ऑफ एज्युकेशनतर्फे राष्ट्रीय कार्यशाळा यशस्वी

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

जगदाळे मामा हॉस्पिटल व कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी आय.क्यु.ए.सी. द्वारा संयुक्त विद्यमाने कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त Sports injury: causes prevention rehabilitation and BLS training या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन जगदाळे मामा हॉस्पिटलच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये करण्यात आले.

राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील तसेच मुख्य उपस्थिती म्हणून खजिनदार जयकुमार शितोळे, डॉ. ऋरिकेश पोळ , डॉ. दिपा बासुंदे, जगदाळे मामा हॉस्पिटलचे सुपरइंटेंडेंट डॉ. रामचंद्र जगताप, कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शीचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, डॉ. धीरज जाधव, डॉ. सौरभ झा, डॉ. इर्शाद शेख उपस्थित होते. डॉ. जगताप यांनी प्रास्ताविक केले. जयकुमार शितोळे यांनी क्रीडा दुखापतींच्या पुनर्वसनासाठी या कार्यशाळेच्या आयोजनाबद्दल कौतुक केले तसेच वयोवृद्धांसाठीही कार्यशाळा आयोजन करण्याबाबत आवाहन केले.



**बार्शी : स्पोर्टस इन्जुरी या राष्ट्रीय कार्यशाळेत बोलताना पी. टी. पाटील. याप्रसंगी प्राचार्य जयकुमार शितोळे, डॉ. ऋरिकेश पोळ , डॉ. दीपा बासुंदे, डॉ. रामचंद्र जगताप आदी.**

आपल्या अध्यक्षीय समारोपात पी. टी. पाटील यांनी वर्तमान परिस्थितीमध्ये स्थानिक पातळीवर खेळाडूंना झालेल्या दुखापतींच्या पुनर्वसनासाठी जागरूक करण्यासाठी अशा स्वरूपाच्या कार्यशाळेच्या आयोजनाबद्दल कौतुक केले.

या कार्यशाळेला महाविद्यालयाच्या बी. एड., बी.पी.एड., एम.एड. व एम.पी.एड. विभागाचे विभाग प्रमुख तसेच प्राध्यापक सहभागी झाले. या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. ए. जी. कांबळे यांनी कार्य केले, सूत्रसंचालन सहा. प्रा. पी. पी. नरळे यांनी केले. तांत्रिक साहाय्य ग्रंथपाल डॉ एस. एल. जाधव व सहा. प्रा. एस. ए. सावळे यांनी केले.

My Solapur Edition
Feb 05, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

News by
गणेश गोडसे,बार्शी



आगळगाव : शालेय आंतरवसिता शिबिराचा प्रारंभ अभिवादनाने करताना शिक्षकवर्ग.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनचे आंतरवसिता शिबिर

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

कॉलेज ऑफ एज्युकेशन येथील बी.एड. प्रथम व द्वितीय वर्षातील प्रशिक्षणार्थींसाठी संत तुकाराम विद्यालय पानगाव, किसान कामगार विद्यालय उपळाई, आणि लोकसेवा विद्यालय आगळगाव येथे सराव पाठ आणि शालेय आंतरवसिता शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शालेय आंतरवासिता कार्यक्रमात बी.एड प्रशिक्षणार्थी दैनिक नावीन्यपूर्ण परिपाठ, प्रात्यक्षिके, उपक्रमशील व प्रयोगशील सराव पाठ तसेच विविध अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम पूर्ण करणार आहेत. यात क्रीडा स्पर्धा, बौद्धिक स्पर्धा, सांस्कृतिक उपक्रम, शाळेतील विविध समित्यांचा अभ्यास,मध्यान्ह भोजन समिती, माजी विद्यार्थी समिती इत्यादीचा समावेश असणार आहे. ही आंतरवसिता यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी अभिरूप मुख्याध्यापक , उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक, तसेच विविध समिती, विभागातील प्रशिक्षणार्थी प्रत्यक्ष कार्यरत असणार आहेत.

यासाठी गटनिहाय पद्धतीने आयोजन करण्यात आले आहे. यात एकूण १०५ बी एड प्रशिक्षणार्थी सहभागी झाले आहेत. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. एम. व्ही. मते, डॉ. पी. ए. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबविण्यात येत आहे.

किसान कामगार विद्यालयाचे मुख्याध्यापक विजयकुमार चौधरी यांनी शालेय आंतर वासिता उपक्रमाचे उदघाटन केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक संदीप शिंदे यांनी केले. यानंतर मुख्याध्यापक चौधरी यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. या वेळी त्यांनी त्यांचे वैयक्तिक अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले . तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षक प्रशिक्षण ही काळाची गरज आहे. प्रशिक्षनार्थींना बी.एड अभ्यासक्रम निवडण्याचे फायदे सांगितले. तसेच शिक्षक होण्याबरोबरच या अभ्यासक्रमातून करिअरच्या इतर विविध संधी उपलब्ध आहेत याबाबत मार्गदर्शन केले. वैशाली कांबळे यांनी विद्यार्थी मनोगत व्यक्त केले. सूत्र संचालन हर्षदा पाडूळे यांनी केले. रेणुका रानमाळ यांनी आभार मानले.

Solapur Edition
Feb 17, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

**पुढारी**

संक्षिप्त

News by
गणेश गोडसे,बार्शी

## दत्तात्रय मस्के यांना पीएच.डी. प्रदान

**बार्शी :** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या संशोधन केंद्रातील विद्यार्थी दत्तात्रय औदुंबर मस्के यांनी विद्यापीठास अंतिम पीएच डी संशोधन प्रबंध सादर केला. मौखिक परीक्षेनंतर मस्के यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची शिक्षणशास्त्र विषयातील पीएच डी पदवी प्रदान करण्यात आली. त्यांच्या संशोधनाचा विषय 'सोलापूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील भूगोल विषयाच्या प्रात्यक्षिक कार्याचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास' असा होता. त्यांनी प्राचार्य डॉ. व्ही. डी. पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, महाविद्यालय विकास समिती सदस्य, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एम. व्ही. मते आदींनी अभिनंदन केले.



दत्तात्रय मस्के

Solapur Edition

Feb 27, 2025 Page No. 05

Powered by: erelego.com

# Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s
# College of Education, Barshi
## Publicity 2024 to 2025

सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित

epaper.dainiktarunbharat.com
28 Feb 2025 - Page 11



## कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

**बार्शी, दि. २७ फेब्रुवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी व महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने कविवर्य कुसुमाग्रज यांची जयंती तथा मराठी राजभाषा दिन पार पडला. यावेळी खजिनदार जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, मसाप बार्शी शाखाचे अध्यक्ष पां. न. निपाणीकर, बी. आर. देशमुख, प्रकाश गव्हाणे, प्रकाश महामुनी, दिलीप कल्याणी, शारदा पानगावकर, सुमन चंद्रशेखर, गिरीश सोनार, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. पी. ए. पाटील उपस्थित होते. शारदा पानगावकर यांनी मराठी गौरव गीत सादर केले. बी. एड. प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. पां. न. निपाणीकर यांनी प्रास्ताविक केले. वक्तृत्व स्पर्धेत यश संपादन केलेल्या स्पर्धकांचा सत्कार करण्यात आला. यात कोमल नहार, आनंद लोंढे व रणजीत भालेराव यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. वक्तृत्व स्पर्धा परीक्षक म्हणून डॉ. आर. ए. फुरडे व डॉ. एम. व्ही. मते यांनी काम पाहिले. कोमल नहार यांनी मनोगत व्यक्त केले. बी. आर. देशमुख व दिलीप कल्याणी, जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी मार्गदर्शन केले. आभार डॉ. पी. ए. पाटील यांनी मानले. सुचिता गायकवाड व अफरोजजहान मोमीन यांनी सूत्रसंचालन केले.

# कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये राजभाषा दिन

**संचार प्रतिनिधी**

**बार्शी, दि. २८ -** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन व महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने कविवर्य कुसुमाग्रज यांची जयंती व मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला.

यावेळी शारदा पानगावकर यांनी मराठी गौरव गीत सादर केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी पां.न. निपाणीकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

मराठी राजभाषा दिनानिमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत यश संपादन केलेल्या स्पर्धकांचा सत्कार करण्यात आला. यात कोमल नहार, आनंद लोंढे व रणजित भालेराव यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. परीक्षक म्हणून डॉ. आर. ए. फुरडे व डॉ. एम.व्ही. मते यांनी काम पाहिले.



कोमल नहार यांनी विद्यार्थी मनोगत व्यक्त केले. बी.आर. देशमुख व दिलीप कल्याणी यांनी मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून खुमासदार शैलीत आपले विचार मांडले. साहित्यिकांनी चळवळीत सहभाग घेतला पाहिजे. समाजाची भावना साहित्यात आली पाहिजे, असे जयकुमार शितोळे म्हणाले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे यांनी मराठी भाषा गौरव दिन याविषयी सविस्तर माहिती विशद केली.

यावेळी संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, बी.आर. देशमुख, प्रकाश गव्हाणे, प्रकाश महामुनी, दिलीप कल्याणी, शारदा पानगावकर, सुमन चंद्रशेखर, गिरीश सोनार, डॉ. आर.ए. फुरडे, डॉ. पी.ए. पाटील आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुचिता गायकवाड व अफरोजजहान मोमीन यांनी केले. आभार डॉ. पी. ए. पाटील यांनी मानले.

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

# पुढारी

www.pudhari.com

## बार्शी शहर व तालुक्यात मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा

### वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन, मराठी विषय शिकवणाऱ्या शिक्षकांचा सत्कार

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शी शहर व तालुक्यातील विविध शाळा महाविद्यालयांमध्ये मराठी राजभाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे खजिनदार बापू शितोळे होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे होते. व्यासपीठावर मसाप बार्शी शाखाचे अध्यक्ष पां. न. निपाणीकर, बी. आर. देशमुख, प्रकाश गव्हाणे, प्रकाश महामुनी, दिलीप कल्याणी, शारदा पानगावकर, सुमन चंद्रशेखर, गिरीश सोनार, डॉ आर. ए. फुरडे, डॉ. पी. ए. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. शारदा पानगावकर यांनी मराठी गौरव गीत सादर केले.



**बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये वक्तृत्व स्पर्धेतील यशस्वीतांना प्रमाणपत्र देताना मान्यवर.**

पां. न. निपाणीकर यांनी प्रास्ताविक केले. वक्तृत्व स्पर्धेतील यशस्वी कोमल नहार, आनंद लोंढे व रणजीत भालेराव या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. परीक्षक म्हणून डॉ. आर. ए. फुरडे व डॉ. एम. व्ही. मते यांनी काम पाहिले. सुचिता गायकवाड व अफरोजजहान मोमीन यांनी सूत्रसंचालन केले.डॉ. पी. ए. पाटील यांनी आभार मानले.

टेक्निकल हायस्कूल येथे कवी कुसुमाग्रज यांची जयंती मराठी राजभाषा दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक विक्रम टकले होते . तर प्रमुख पाहूणे म्हणून सत्यजित जानराव ,अर्चना जमाले या होत्या.प्रास्ताविकात आनंद कुलकर्णी यांनी कुसुमाग्रजांच्या कार्याचा आढाव घेतला. सर्व मराठी विषय शिकवणाऱ्या शिक्षकांचा सत्कार यानिमित्ताने करण्यात आला. सत्यजित जानराव यांनी कुसुमाग्रजांच्या अनेक कविता विद्यार्थ्यांपुढे सांगत मराठी भाषेचे महत्व सांगितले. या कार्यक्रमात अर्चना जमाले, भैरवनाथ काळे, उमेश काशिद यांचा सत्कार करण्यात आला. सुत्रसंचलन शिवाजी पवार यांनी केले. श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालयाते कविवर्य वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जन्मदिना निमित्त मराठी राजभाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी वाचनालयाचे पदाधिकारी, वाचक उपस्थित होते.

### कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात मराठी राजभाषा

कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात प्रमुख मान्यवरांचे हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी ग्रंथालयाचे उपाध्यक्ष धैयशील देशमुख होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वृक्षमित्र सुनिल फल्ले हे होते. यावेळी अनिल धाट, सुरेश शिंदे, प्रेम अग्रवाल,राहुल लोंढे यांच्यासह बालवाचक आर्यन पोकळे, मंथन घावटे, अक्षय पोकळे, शौनक अग्रवाल, वाचक व सभासद उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी केले.

Solapur Edition
Mar 01, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com



बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना निपाणीकर.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये विज्ञान दिन साजरा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी व महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिनाचे आयोजन झाले.

अध्यक्षस्थानी डॉ. व्ही. पी. शिखरे होते. मसाप बार्शी शाखाध्यक्ष पां. न. निपाणीकर, अंनिसचे कार्याध्यक्ष उमेश पोतदार, सिद्धेश्वर धुमाळ, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. एम. व्ही. मते, डॉ. पी. ए. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. सुदर्शन तनपुरे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. पी. ए. पाटील यांनी विज्ञान कविता सादर केली. निपाणीकर यांनी स्वरचित विज्ञान गीत सादर करून प्रेरणादायी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, प्रश्न विचारणे ही वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्याची पहिली पायरी आहे. अध्यक्षीय भाषणात डॉ. शिखरे यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाविषयी सविस्तर माहिती विशद केली. काजल पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रिया पतंगे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. शीतल यादव व सलमा मुलाणी यांनी सूत्रसंचालन केले. प्रगती शिंदे यांनी आभार मानले.

Solapur Edition
Mar 02, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

# Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2024 to 2025

सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
04 Mar 2025 - Page 6

# धाराशिव, वेळापूर व किरण स्पोर्टस सोलापूरची विजयी घोडदौड

## कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे मामा यांच्या जयंतीनिमित्त विभागीय निमंत्रित पुरुष खो-खो स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मार्च-**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे मामा यांच्या १२२व्या जयंतीनिमित्त सुरु असलेल्या पुरुष गटाच्या विभागीय निमंत्रित खो-खो स्पर्धेत पुरुष गटात अ गटातून धाराशिवचे छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळ व सोलापूरचे किरण स्पोर्टस् क्लबने प्रत्येकी दोन सामने जिंकत विजयी घोडदौड कायम ठेवली आहे.

शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या कर्मवीर मैदानावर सुरू असेलल्या या स्पर्धेत ब गटातून वेळापूरच्या अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाने दोन सामने जिंकत आघाडी घेतली आहे तर धाराशिवचे तुळजाभवानी क्रीडा मंडळ व साताराच्या स्वराज्य या संघानी प्रत्येकी एक सामने जिंकले आहेत.

मंगळवारी या स्पर्धेचा समारोप असून बार्शीच्या श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी. टी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहसचिव अरुण देबडवार व बार्शीचे पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या हस्ते या स्पर्धेतील प्रथम तीन संघास बक्षिस वितरण करण्यात येईल. या संघाना अनुक्रमे २१, १५ व ११ हजार व वैयक्तिक खेळाडूंना अष्टपैलू, आक्रमक व संरक्षकाचे प्रत्येकी २ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

**रविवारी रात्री व सोमवारी सकाळी झालेल्या साखळी सामन्याचे निकाल**

- अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळ वेळापूर विजयी विरुद्ध श्री. तुळजाभवानी क्रीडा मंडळ, धाराशिव १८-१६ (२ गुण व ३० सेकंद राखून विजयी).
- किरण स्पोर्टस् सोलापूर विजयी विरुद्ध शिवप्रतिष्ठान मंगळवेढा १७-१५ (२ गुणांनी विजयी)
- किरण स्पोर्टस् सोलापूर विजयी विरुद्ध ओगलेवाडी स्पोर्टस् क्लब सातारा २१-१५ (६ गुणानी विजयी)
- छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळ धाराशिव विजयी विरुद्ध शिवप्रतिष्ठान मंगळवेढा १३-१२ (८.३० मि. राखून).
- अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळ वेळापूर विजयी विरुद्ध उत्कर्ष क्रीडा मंडळ सोलापूर ९-८ (१ डाव १ गुणांनी विजयी).
- स्वराज्य संघ सातारा विजयी विरुद्ध उत्कर्ष क्रीडा मंडळ सोलापूर १७-१४ (३ गुणांनी विजयी).
- तुळजाभवानी क्रीडा मंडळ धाराशिव विजयी विरुद्ध स्वराज्य क्रीडा मंडळ सातारा १६-११ (१ डाव ५ गुणांनी विजयी).

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

# धाराशिव, वेळापूर व किरण स्पोर्टस् सोलापूरची विजयी घोडदौड

**संचार प्रतिनिधी**

**बार्शी, दि. ४-** कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त सुरू असलेल्या पुरुष गटाच्या विभागीय निमंत्रित खो-खो स्पर्धेत पुरुष गटात अ गटातून धाराशिवचे छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळ व सोलापूरच्या किरण स्पोर्टस् क्लबने प्रत्येकी दोन सामने जिंकत विजयी घोडदौड कायम ठेवली आहे.



श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या कर्मवीर मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत व गटातून वेळापूरच्या अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाने दोन सामने जिंकत आघाडी घेतली आहे तर धाराशिवचे तुळजाभवानी क्रीडा मंडळ व साताऱ्याच्या स्वराज्य या संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी. टी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली, सहसचिव अरुण देवडवार, बार्शीचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या हस्ते तसेच प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांच्या उपस्थितीत या स्पर्धेतील प्रथम तीन संघांना बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. या संघांना अनुक्रमे रुपये २१ हजार, १५ हजार व ११ हजार व वैयक्तिक खेळाडूंना अष्टपैलू, आक्रमक व संरक्षकाचे प्रत्येकी २ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

स्पर्धा यशस्वीतेसाठी एम.पी. एड. विभागप्रमुख डॉ. एस. एम. लांडगे, बी.पी.एड. विभागप्रमुख डॉ. ए. जी. कांबळे, बी.एड. विभागप्रमुख डॉ. व्ही. पी. शिखरे, स्पर्धा सचिव डॉ. एस. एस. मारकड, प्रा. स्मिता सुरवसे, प्रा. पी. पी. नरळे, प्रा. शरद सावळे, प्रा. के. बी. चव्हाण, प्रा. स्वप्निल अंधारे, बी.पी. एड. व एम.पी.एड. विभागाचे प्रशिक्षणार्थी परिश्रम घेत आहेत.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

# धाराशिवचे छत्रपती मंडळ कर्मवीर खो-खो चषकाचे मानकरी

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त कॉलेज ऑफ एज्युकेशन आयोजित विभागीय निमंत्रित खो-खो स्पर्धा झाल्या. यात धाराशिवच्या छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळाने सोलापूरच्या किरण स्पोर्टस् क्लबवर मात करीत कर्मवीर खो - खो चषकाचा मानकरी ठरला.

अध्यक्षस्थानी संस्थेचे जनरल सचिव. प्रकाश पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे सरचिटणीस डॉ चंद्रजीत जाधव, शिवशक्ती बँकेचे चेअरमन डॉ प्रकाश बुरगुटे, संस्थेचे सहसचिव ए. पी. देबडवार होते. व्यासपीठावर संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, खजिनदार बापू शितोळे, प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे, अजितकुमार संगवे, श्रीकांत ढेपे, क्रीडा अधिकारी सत्यम जाधव, रामजी कश्यप, प्रदीप लोंढे, स्मिता बुरगुटे, अमृत राऊत, स्पर्धा निरीक्षक प्रवीण बागल, राजाभाऊ शिंदे, माजी प्राचार्य डॉ. सी. एस. मोरे, व्ही. एस. पाटील, डॉ. दिलीप मोहिते, डॉ. एस. एम. लांडगे, स्पर्धा सचिव डॉ. एस. एस. मारकड आदी उपस्थित होते. या स्पर्धेत सातारा, सांगली, सोलापूर व धाराशिव या जिल्ह्यातील एकूण आठ संघ सहभागी झाले होते. श्रीरंग बनसोडे यांनी पंच म्हणून काम केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. शरद सावळे यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. स्मिता सुरवसे व प्रा. पी पी नरळे यांनी केले. स्पर्धा सचिव डॉ. एस. एस. मारकड यांनी आभार मानले. डॉ. एस. एम. लांडगे, ए. जी. कांबळे, व्ही. पी. शिखरे, एस. एस. मारकड प्रा. स्मिता सुरवसे, प्रा. पी. पी. नरळे, प्रा. शरद सावळे, प्रा. के. बी. चव्हाण, प्रा. स्वप्निल अंधारे आदींनी परिश्रम घेतले.



बार्शी : कर्मवीर खो-खो चषकाचे मानकरी धाराशिवचे छत्रपती मंडळासह उपस्थित मान्यवर.

## बक्षिसाचे मानकरी

विजेता - छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळ धाराशिव २१ हजार व ट्रॉफी), उपविजेता - किरण स्पोर्टस् क्लब सोलापूर १५ हजार व ट्रॉफी, तृतीय - श्री तुळजाभवानी क्रीडा मंडळ, धाराशिव ११ हजार व ट्रॉफी, चौथा- अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळ, वेळापूर ५ हजार, उत्कृष्ट संरक्षक - विजय शिंदे (छत्रपती व्यायामशाळा, धाराशिव), उत्कृष्ट आक्रमक खेळाडू - अक्षय इंगळे (किरण स्पोर्टस् सोलापूर), अष्टपैलू खेळाडू - रोहित चव्हाण (छत्रपती शाळा धाराशिव)

My Solapur Edition

Mar 07, 2025 Page No. 03

Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

**पुढारी**

www.pudhari.com

News by
गणेश गोडसे,बार्शी

## विविध उपक्रमांनी बार्शीसह तालुक्यात महिला दिन साजरा

### विविध स्पर्धेसह शाळेतील महिला शिक्षिकांचा सन्मान

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

विविध सामाजिक उपक्रमांनी बार्शी शहर व तालुक्यात ठिकठिकाणी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून होमिओपॅथिक तज्ज्ञ डॉ. क्षमा बकाल व पोलिस कर्मचारी ज्योती पंढरे उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे होते. व्यासपीठावर माजी प्राचार्य डॉ. सो. एस. मोरे, व्ही. पी. शिखरे, ए. जी. कांबळे, डॉ.एम. एस. डिसले, आर. ए. फुरडे, स्मिता सुरवसे, एस. व्ही. मते, पी. ए. पाटील, पी. पी. नाळे आदी उपस्थित होते. सुदर्शन तनपुरे, सुचिता गायकवाड व रणजित भालेराव यांनी शालेय आंतरवासिता अहवाल



बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील कार्यक्रमात बोलताना प्राचार्य सुग्रीव गोरे.

सादरीकरण केले. डॉ. बकाल, प्राचार्य गोरे यांनी मनोगत व्यक्त केले. रेश्मा जगदाळे व ऋतुजा मोरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. व्ही. मते यांनी आभार मानले.

पांगरीच्या राजीव गांधी आश्रमशाळेत जिजाऊ, रमाई व सावित्री यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. महिला शिक्षिका व महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार संस्थापक व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. संजीव बगाडे व मुख्याध्यापिका बगाडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपमुख्याध्यापक मुळे, पर्यवेक्षिका राऊत उपस्थित होत्या. सूत्रसंचालन शिवाजी बगाडे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाहिद शेख, मुलाणी, सचिन नवले, गणेश गोडसे, तानाजी चव्हाण, अण्णा काळे यांनी परिश्रम घेतले.

बार्शीतील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालयात महिला सभासदांना भगवद्गीता हे पुस्तक भेट देऊन सत्कार करून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. महिला सभासदांचा सत्कार करण्यात आला. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, संचालक धिरज कुंकूलोळ, प्रमोद भंडारी, ग्रंथपाल सुरेश यादव उपस्थित होते. वाचनालयाचे सहा. ग्रंथपाल पल्लवी तौर यांनी प्रास्ताविक केले. लिपिक विराज यांनी यांनी आभार मानले.

शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात जागतिक महिला दिनासह संस्थेचे संस्थापक कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या पत्नी स्वर्गीय लक्ष्मीबाई जगदाळे यांची जयंतीही साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. दीपक गुंड व व्याख्याते जे. जी. माळी व इतर शिक्षक कर्मचारी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे तसेच स्वर्गीय लक्ष्मीबाई जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

प्रास्ताविक गायकवाड जे.पी. यांनी केले. यानंतर अध्यापक विद्यालयातील विद्यार्थिनी अक्षता शिंदे, रोहिणी मारडकर व आदित्य देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. माळी, दीपक गुंड यांनी मनोगत व्यक्त केले. वैष्णवी शिराळकर यांनी आभार मानले.

#### गाताचीवाडीत महिला शेतकऱ्यांचा सत्कार

गाताचीवाडीत राष्ट्रीय सेवा योजना, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय बार्शी यांच्या वतीने महिला दिन उत्साहात साजरा झाला. गावच्या पोलिसपाटील शीतल भाडगे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. संगीता बांगर, विद्या गात यांनी महिलांच्या अस्तित्वाबद्दलचे मार्गदर्शन केले. शेतकरी महिलांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन रूपाली मोरे यांनी केले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी डॉ. स्नेहलता मोरे यांनी केले. डॉ. कविता गायसमुद्रे यांनी आभार मानले.

My Solapur Edition
Mar 12, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

# पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

संक्षिप्त

News by
गणेश गोडसे,बार्शी




बार्शी : नोकरी मार्गदर्शन कक्ष व एमआयटी यांच्या संयुक्त विद्यमाने झालेले प्लेसमेंट कॅम्प.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये प्लेसमेंट कॅम्प

**बार्शी :** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये नोकरी मार्गदर्शन कक्ष व एमआयटी यांच्या संयुक्त विद्यमाने प्लेसमेंट कॅम्पचे आयोजन झाले. यात एकूण ४१ विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखतीद्वारे शारीरिक शिक्षक व विषय शिक्षक म्हणून निवड केली जाणार आहे. त्यासाठी मुलाखत दिलेल्या उमेदवारांचे पुढील टप्प्यात प्रत्यक्ष अध्यापन घेऊन नियुक्ती दिली जाणार आहे. या कॅम्पवेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, बी.एड. विभाग प्रमुख डॉ. व्ही. पी. शिखरे, बी. पी. एड. विभाग प्रमुख डॉ. ए. जी. कांबळे, एम.पी.एड. विभाग प्रमुख डॉ एस. एम. लांडगे आदी उपस्थित होते. सदर प्लेसमेंट कॅम्पच्या यशस्वीतेसाठी नोकरी मार्गदर्शन कक्ष समन्वयक डॉ. पी. ए. पाटील, प्रा. खंडू चव्हाण व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

Solapur Edition
Mar 23, 2025 Page No. 09
Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s

# College of Education, Barshi

## Publicity 2024 to 2025

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

संक्षिप्त



बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये शुभेच्छा प्रदान समारंभात मार्गदर्शन करताना मान्यवर.

### कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये शुभेच्छा प्रदान समारंभ उत्साहात

**बार्शी :** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थींचा शुभेच्छा प्रदान समारंभ झाला. यावेळी पाहुणे म्हणून मुख्याध्यापक प्रशांत कोल्हे होते.अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सुग्रीव गोरे होते. व्यासपीठावर डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. ए. जी. कांबळे, डॉ. एस. एम. लांडगे उपस्थित होते. हर्षदा पाडुळे, अंजली उपाध्ये व कोमल जंत्रे या प्रशिक्षणार्थींनी आपले अनुभव विशद केले. कॉलेजमधील मानवी व भौतिक सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले. विविध उपक्रम व प्रात्यक्षिक कार्यात उल्लेखनीय कार्य केलेल्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.प्रमुख पाहुणे कोल्हे यांनी शिस्त, वक्तशीरपणा व मूल्ये अंगी जोपासा. सामाजिक भान ठेवून ज्ञानदानाचे पवित्र कार्य करा असे त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. गोरे म्हणाले की, आनंदी जीवन जगा. ताण तणावातून बाहेर पडा. स्पर्धेत सहभागी होऊन यशस्वी व्हा. प्रास्ताविक डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी केले. प्रा. एस. ए. सावळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. आर. ए. फुरडे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. एम. व्ही. मते यांनी प्रमाणपत्र वितरण केले. प्रा. के. बी. चव्हाण यांनी जिमखाना अहवाल सादर केला. डॉ. एम. एस. डिसले यांनी आभार मानले. डॉ. पी. ए. पाटील आणि डॉ. एल. आय. राठोड यांनी सूत्रसंचालन केले.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

**पुढारी**

स्थापना १९३९

www.pudhari.com

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी येथे बी. पी.एड. विभागाच्या १९८५-८६ बॅचचा माजी विद्यार्थी मेळावा मोठ्या उत्साहात झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव तर अध्यक्षस्थानी जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील आदी उपस्थित होते. व्यासपीठावर संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे, कार्यकारिणी सदस्य व्ही. एस. पाटील, विश्वस्त डॉ. चंद्रकांत मोरे, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, डॉ. एस. एम. लांडगे आदी मान्यवर उपस्थित होते.



**बार्शी : माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात सहभागी झालेले विद्यार्थी.**

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व कॉलेज जीवनातील अनुभव व्यक्त केले. जुन्या आठवणींना उजाळा दिला. यामध्ये विलास पवार, अनिल देशपांडे, जयश्री शिंदे या माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. माजी विद्यार्थी कॉलेजचे मौल्यवान धन आहे. माजी विद्यार्थी संस्थेच्या विकासाकडे मोठ्या आदराने पाहतात. या मेळाव्यातून आपण गतकाळातील अनुभव, वर्गातील आंतरक्रिया तसेच मैदानावरील कौशल्य व त्यावेळेसच्या एकूणच सर्व बाबी आपल्या डोळ्यासमोर उभे राहतात. म्हणून माजी विद्यार्थी मेळावा आपल्याला एक सुखद अनुभव देऊन जातो. आपले विद्यार्थी देशाच्या विविध काना-कोपऱ्यात आपले कार्य कौशल्य राबवित आहेत, याचा आम्हास अभिमान आहे. संपूर्ण देशात आपले विद्यार्थी कॉलेजचा नावलौकिक वाढवित आहेत. माजी विद्यार्थी हे संस्थेचे व कॉलेजचे संदेश वाहक आहेत. निश्चितच आपण या कॉलेजची व संस्थेची भरभराट व नावलौकिक लोकप्रिय कराल, अशी आशा आहे, असे त्यांनी सांगितले.

शितोळे म्हणाले की म्हणाले, कॉलेज प्रारंभीपासूनच क्रीडा क्षेत्रात लोकप्रिय आहे. देशाच्या विविध भागात आणि विविध क्षेत्रात आपले विद्यार्थी कार्य करीत आहेत. संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव म्हणाले, चाळीस वर्षांनंतर महाविद्यालयाचा परिसर पाहून तसेच येथील मानवी व भौतिक सुविधांबद्दल समाधान व्यक्त केल्याबद्दल माजी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. पी. टी. पाटील म्हणाले की, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी शिक्षणशास्त्राबरोबरच शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय सुरू केले.

प्रास्ताविक प्रा. शकुर सय्यद यांनी केले. आभार प्रा. पी. पी. नरळे यांनी मानले. प्रा. स्मिता सुरवसे यांनी सूत्रसंचालन केले.

My Solapur Edition
Apr 25, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2024 to 2025**

अमृतमहोत्सवी

पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

News by
गणेश गोडसे, बार्शी



बार्शी : डॉ. व्ही. पी. शिखरे यांना प्राचार्यपदाचे पत्र देताना जयकुमार शितोळे व प्रमोद जाधव.

## प्रभारी प्राचार्यपदी डॉ. शिखरे यांची निवड

**बार्शी :** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्रभारी प्राचार्यपदी डॉ. व्ही. पी. शिखरे यांची निवड संस्थेच्या वतीने करण्यात आली. त्यांच्या निवडीचे पत्र संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे व शिवाजी महाविद्यालयाचे प्रबंधक प्रमोद जाधव यांच्या हस्ते देण्यात आले. डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी एम.एस्सी एम.एड, एम.फिल, पीएच.डी., सेट, नेट, एमबीए अशा शैक्षणिक पदव्या संपादन केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय जर्नल्स मध्ये एकूण ७६ संशोधन पेपर प्रकाशित केले असून, २ मायनर रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण केले आहेत. निवडीबद्दल डॉ. शिखरे यांचे संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देवडवार, खजिनदार जे. सी. शितोळे आदींनी अभिनंदन केले.

Solapur Edition
May 12, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com